# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०८/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १८/०८/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहीती मिळाली की, मौजा किरणापुर फाटा येथे अवैधरित्या रेतीचे उत्खनन होत आहे. अशी माहिती मुखबीरद्वारे मिळाल्याने घटनास्थळावर मौजा किरणापुर फाटा येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम.एच–४०/सि.व्ही. ५९५८ येतांनी दिसला. ट्रकचा चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक **आरोपी नामे– पवनकुमार शकरलाल कहार, वय ३२ वर्ष रा. भरदा तह. लाखानदौन जि. शिवणी एम.पी.** याने आरोपी क्र. ०२) मालक नामे– नरेन्द्र शर्मा रा. वैष्णवी नगर नागपुर याच्या सांगणेवरून त्याचे ट्रक मध्ये अवैध्यरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून ट्रक क्र. एम. एच– ४०/सि.व्ही. ५९५८ किंमती ३०,०००००/–रू. ट्रक मध्ये असलेली ०८ ब्रास रेती किंमती अंदाजे २४,०००/– रुपये असा एकुण वाहनासह ३०,२४,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे–पोहवा संदीप बाजनघाटे पोस्टे अरोली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०३(२), ४९ भा.न्या.स. सहकलम ४८(७), ४८(८), म.ज.म.स. १९६६, स.क. ४, २१ खाण आणी खनीजे अधिनियम सहकलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतीबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि स्नेहल राउत, पोहवा संदीप बाजनघाटे, पोअं. राकेश राऊत यांनी पार पाडली.



## जुगार खेळणारे ईसमांवर नरखेड पोलीसांची कारवाई

दिनांक १८/०८/२०२४ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथील पोलीस पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, नरखेड शहरातील नारायण हॉलच्या मागच्या परीसरात काही लोक पैशाची बाजी लावून हार जितचा जुगार खेळत आहे अशा माहिती वरून पोलीस पथक घटनास्थळी त्वरीत रवाना झाले. नरखेड येथील नारायण हॉलच्या मागच्या परीसरात मोटार सायकलच्या उजेडात लोकांचा घोळका दिसल्याने पोलीस पथकाने त्यांना घेराव घालून त्याच्यावर रेड केली असता मोटार सायकलच्या उजेडात जुगार खेळत असलेले काही लोक पोलीसांना पाहुण पळून गेले मोक्यावर जुगार खेळतांना मिळुन आलेल्या ४ ईसमांना पोलीसानी ताब्यात घेतले. त्यांचे नाव जफर शफी शेख, मुकेश संतापे, नंदु बरगट व हनुमंत इंगळे असे असुन त्यांच्या ताब्यातुन नगदी ७,०७०/—रू, डावावर खुल्ले ५२ तास पत्ते किंमती ५०/—रू. तसेच घटनास्थळावर ३ तासपत्ते कॅट किंमती १५०/— रू. एक लाल पिवळया रंगाची १५ फुट लांब व ०६ फुट रुंदीची ताडपतरी किंमती ८००/— रू. एक डेस्टीनी १२५ स्कूटी मोसा क्रमांक MH 40 CN-7383 किंमती ४०,०००/—रू असा एकुण ४८,०७०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतला व सरकारतर्फे फिर्याद देवून नमुद आरोपीतांविरुध्द पो.स्टेला गुन्हा नोंद क्र. ३८४/२४ कलम १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये दाखल केला.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर